# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

**परिपत्रक क्र.215/२०२२**

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत केंद्र सरकारच्या सूचनांनुसार "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविण्याबाबतच्या सविस्तर सूचना महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-८२२२/प्र.क्र.११०(भाग-२)/सांका.४, दिनांक २० जुलै, २०२२ नुसार देण्यात आल्या आहेत. याबाबत महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/आस्था-२, दिनांक २२ जुलै, २०२२ अन्वये केंद्र शासनाच्या सूचनांनुसार "हर घर तिरंगा" (घरोघरी तिरंगा) हा उपक्रम दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राबविण्यात यावा. सदर उपक्रम उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शासकीय/निमशासकीय कार्यालये, सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, वसतिगृहे, निवासस्थाने इ. इमारतींवर राष्ट्रध्वज फडकविला जाईल याची खातरजमा सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी करावी. तसेच सदर उपक्रम राबविताना त्यात प्रामुख्याने उक्त नमूद शासन परिपत्रकांमधील बाबींचे पालन करावे, असे निर्देश दिलेले आहेत. (सोबत शासन परिपत्रक जोडत आहे.) सदर शासन परिपत्रकांमधील आशय स्वयंस्पष्ट आहे.

सदर शासन परिपत्रकांस अनुसरुन सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन परिपत्रकांमध्ये नमूद बाबींचे पालन करुन "हर घर तिरंगा" (घरोघरी तिरंगा) हा उपक्रम दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राबविण्यात यावा.

**सोबत :- १. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-८२२२/प्र.क्र.११०(भाग-२)/सांका.४, दिनांक २० जुलै, २०२२**
**२. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/आस्था-२, दिनांक २२ जुलै, २०२२.**

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र. एएन/ 3293 )
दिनांक : 30 JUL 2022 )

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

D:\2022\Circular 2022\Circular - Independence Day.docx

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत
"हर घर तिरंगा" हा उपक्रम दिनांक १३
ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२२ या
कालावधीत राबविण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :२० जुलै, २०२२

वाचा :- १) शासन परिपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग सम क्रमांक दिनांक २० जून, २०२२
२) शासन परिपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग सम क्रमांक दिनांक ३० जून, २०२२
३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.१६१/सां.का.४, दिनांक ३० जून, २०२२

शासन परिपत्रक :-

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्याबाबतच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना उपर्निर्दिष्ट क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये एकत्रितरित्या प्रसृत करण्यात आल्या आहेत. उपर्निर्दिष्ट क्र. २ च्या शासन परिपत्रकान्वये "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर झंडा" या उपक्रमास "हर घर तिरंगा" उपक्रम असे संबोधण्याबाबत कळविले आहे. उपर्निर्दिष्ट क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये विविध पातळीवर "स्वराज्य महोत्सव" यांचे आयोजन करणेबाबत कळविले आहे. केंद्रिय कॅबिनेट सचिवांच्या सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांसोबत दिनांक १५ जुलै, २०२२ च्या दूरदृष्यप्रणालीद्वारे झालेल्या बैठकीमधील सादरीकरणामध्ये "हर घर तिरंगा" हा उपक्रम आता दिनांक १३ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राबविण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. तसेच मा. गृह मंत्री, भारत सरकार यांनी दिनांक १७ जुलै, २०२२ रोजी दूरदृश्यप्रणालीद्वारे "हर घर तिरंगा" हा उपक्रम देशात यशस्वी करण्यासाठी सूचना दिल्या आहेत.

२. केंद्र शासनाने "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या वेळापत्रकात केलेला बदल विचारात घेता "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राज्यात दिनांक १३ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राबविण्यात यावा.

३.  "हर घर तिरंगा" हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसार, प्रचार व जाणीव जागृती मोहिमेसाठी सांस्कृतिक कार्य विभागाने जिंगल, गीते, ध्वनीचित्रफित, जाहिराती, लघु चित्रपट, सेलिब्रिटीच्या माध्यमातून आवाहन, पोस्टर इ. याची निर्मिती केली आहे. ती शासनाच्या https://mahaamrut.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर संकेत स्थळावर सदरची माहिती कोणत्याही विभागास / नागरिकाला उपलब्ध होऊ शकते. त्याचा अधिकाधिक उपयोग करुन घेण्यात यावा.

४.  "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना खालीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात येत आहेत.

१. सर्व शासकीय / निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी समाज माध्यमांद्वारे (फेसबुकपेज, ट्विटर, इंस्ट्राग्राम, व्हॉटस्अॅप इ.) तिरंगा विषयक चित्र, संदेश प्रदर्शित करण्यासाठी त्यांना संबंधित विभागांमार्फत आवाहन करण्यात यावे.

२. महाराष्ट्र शासनाच्या प्रत्येक विभागाच्या वेबसाईटच्या दर्शनी भागावर "हर घर तिरंगा" ही टॅगलाईन व तिरंग्याचे चित्र प्रदर्शित करावे.

३. शालेय शिक्षण विभागाने, उच्च तंत्र शिक्षण विभागाने, आदिवासी विभागाने व सामाजिक न्याय विभागाने सर्व शालेय व महाविद्यालयीन तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून (एनएसएस, एनसीसीए द्वारे) प्रभातफेरीचे आयोजन करुन "हर घर तिरंगा" य़ा उपक्रमाविषयी पालक व नागरिकांमध्ये प्रचार, प्रसार व जाणीव जागृती करण्यात यावी.

४. "हर घर तिरंगा" या उपक्रमांतर्गत सर्व शासकीय व निम शासकीय कार्यालये, शासकीय इमारती, शासकीय वसाहतींमध्ये राष्ट्रध्वज फडकेल, याची विशेष काळजी सार्वजनिक बांधकाम विभागाने घेणे आवश्यक आहे.

५. राज्यातील सर्व सहकारी संस्था / सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये राष्ट्रध्वज फडकविला जाईल, याची खातरजमा सहकार विभागाने करणे आवश्यक राहील.

६. "हर घर तिरंगा" या उपक्रमात जास्तीत-जास्त लोकसहभाग मिळविण्यासाठी सर्व प्रशासकीय विभाग व क्षेत्रिय कार्यालयाने कल्पक उपाययोजना कराव्यात.

७. राज्यातील नाट्यगृह व चित्रपटगृहे याठिकाणी चित्रपट किंवा नाटक सुरु होण्यापूर्वी "हर घर तिरंगा" या उपक्रमासंदर्भातील गाणी, जिंगल्स, ध्वनीचित्रफिती, ध्वनीफिते दाखविण्यात / वाजविण्यात याव्यात. यासंदर्भात चित्रपटगृहे व नाट्यगृहे व्यवस्थापकांना गृह विभाग व महसूल विभागाकडून स्थानिक पातळीवर सूचना देण्यात याव्यात.

८. राज्यातील खाजगी टि.व्ही. वाहिन्या, कम्युनिटी रेडिओ, स्थानिक केबल धारक, एफएम रेडिओ, यांनाही "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या ध्वनीफिती, ध्वनीचित्रफिती, जिंगल्स, गीते, पोस्टर्स दाखविण्याबाबत / ऐकविण्याबाबत गृह विभाग, महसूल विभाग, माहिती व जनसंपर्क विभागाकडून सर्व संबंधितांना निर्देश द्यावेत.

९. "हर घर तिरंगा" अंतर्गत राष्ट्रध्वज नागरिकांना विकत घेण्यासाठीची उपलब्धता तलाठी कार्यालय, पोस्ट ऑफिस, ग्रामपंचायत ऑफिस, रास्त भाव धान्य दुकाने व

महानगर पालिका / नगर पालिका वॉर्ड ऑफिसेस यांच्यामार्फत करण्याची विशेष काळजी ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि महसूल व वन विभाग यांनी घ्यावी.

१०. राज्यातील सर्व आदिवासी पाडयांमध्ये राष्ट्रध्वजा विषयी प्रचार, प्रसार व जाणीव जागृती तसेच राष्ट्रध्वज उपलब्धता यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत कार्यवाही करण्यात यावी.

५. भारतीय ध्वज संहितेचे पालन होणे व जाणते-अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये याची दक्षता घेण्याबाबत नागरिकांमध्ये जाणीवजागृती निर्माण करुन घेण्याची सर्व विभागांनी विशेष काळजी घ्यावी.

६. स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, महसूल यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्र, रास्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन बाबींशी निगडीत यंत्रणांद्वारे "हर घर तिरंगा" हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांचे मोठे योगदान असेल, याची सर्व संबंधित विभागांनी खातरजमा करावी.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२०७ २१०८५८३८७८२३ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

२०/७/२०२२

(मनु कुमार श्रीवास्तव)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव मंत्रालय, मुंबई
५. सर्व विभागीय आयुक्त
६. सर्व पोलीस आयुक्त
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०. सर्व आयुक्त, महानगर पालिका
११. सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका / नगर पंचायत
१२. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
१३. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली सर्व क्षेत्रिय अधिकारी
१४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१५. निवड नस्ती, सां.का.४

“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत “घरोघरी तिरंगा” हा उपक्रम दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राबविण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/आस्था-२,**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**दिनांक : २२ जुलै, २०२२.**

वाचा :- शासन परिपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.संकीर्ण-८२२२/प्र.क्र.११०(भाग-२)/सांका.४, दिनांक २० जुलै, २०२२.

**प्रस्तावना :-**

“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत केंद्र सरकारच्या सूचनांनुसार “हर घर तिरंगा” हा उपक्रम राबविण्याबाबतच्या सविस्तर सूचना उपरोक्त वाचामधील शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शासकीय/निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, निवासस्थाने, इ. इमारतींवर “हर घर तिरंगा” या उपक्रमांतर्गत राष्ट्रध्वज फडकविण्यासंदर्भात त्यानुसार पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार “हर घर तिरंगा” (घरोघरी तिरंगा) हा उपक्रम दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राबविण्यात यावा. सदर उपक्रम उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शासकीय/ निमशासकीय कार्यालये, सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, वसतिगृहे, निवासस्थाने, इ. इमारतींवर राष्ट्रध्वज फडकविला जाईल याची खातरजमा सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी करावी. सदर उपक्रम राबविताना त्यात प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश करावा:-

१) प्रत्येक विभाग/उप विभाग, विद्यापीठ/महाविद्यालय, कार्यालय यांच्या वेबसाईटच्या दर्शनी भागावर “घरोघरी तिरंगा” ही टॅगलाईन तसेच तिरंग्याचे चित्र प्रदर्शित करावे.

२) सर्व शासकीय/निम शासकीय अधिकारी/कर्मचारी/शिक्षक/शिक्षेतर कर्मचारी/विद्यार्थी/पालक यांनी समाज माध्यामांद्वारे (फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, व्हॉटसअप, इ.) तिरंग्याविषयक चित्र, संदेश प्रदर्शित करण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी आवाहन करावे.

३) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमार्फत प्रभात फेरीचे आयोजन करुन या उपक्रमाबाबत पालक व नागरिकांमध्ये प्रचार, प्रसार व जाणीव/जागृती करावी. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा समावेश करुन मोठ्या प्रमाणावर आयोजन करता येईल.

४) शासकीय/निम शासकीय इमारतींबरोबरच खाजगी इमारतींवर अथवा राहत्या घरावर तिरंगा फडकविण्याबाबत सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी पुढाकार घ्यावा. जेणेकरुन इतर नागरिकांमध्ये या उपक्रमाची जागृती निर्माण होण्यास मदत होईल.

५) सांस्कृतिक कार्य विभागाने सदर उपक्रमाच्या जागृती मोहिमेसाठी जिंगल, गीते, ध्वनीचित्रफित, इ. ची निर्मिती केली आहे. त्याबाबतची माहिती शासनाच्या https://mahaamrut.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर जिंगल्स, गीते, पोस्टर्स, इ.चा वापर शासकीय अधिकारी/कर्मचारी तसेच सर्वसाधारण नागरिकांनी देखील सदर उपक्रमाच्या प्रचार, प्रसारासाठी करावा.

६) सदर उपक्रमाकरिता राष्ट्रध्वजाची उपलब्धता महसूल विभागामार्फत तसेच इतर विभागांमार्फत देखील तालुका/गांव पातळीपर्यंत करण्यासंबंधीच्या सूचना यापूर्वीच शासन स्तरावरुन देण्यात आलेल्या आहेत. त्यांच्याकडून सुनिश्चित केलेल्या दराने राष्ट्रध्वज सर्वांना खरेदीसाठी उपलब्ध असतील.

७) "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या कार्यक्रमांबाबतचे फोटो, चित्रफिती सांस्कृतिक कार्य विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करण्याची कार्यवाही राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना यांचेमार्फत सुरु आहे. त्याचप्रमाणे "घरोघरी तिरंगा" कार्यक्रमाचे फोटो, चित्रफिती, इ. मोठ्या प्रमाणावर वेबसाईटवर अपलोड होण्यासाठी राज्य संपर्क अधिकारी, रा.से.यो. यांनी विशेष पथक तयार करुन त्यांचेमार्फत अपलोड करण्याची कार्यवाही करावी. जेणेकरुन राज्यातील उपक्रमाची जास्तीत जास्त माहिती देश पातळीवर पोहचेल.

८) वरील सर्व उपक्रम राबविताना भारतीय ध्वज संहितेचे पालन होणे आवश्यक असून जाणते-अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये याची सर्वांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे याबाबत देखील जाणीव जागृती करण्यात यावी.

सर्व विद्यापीठाच्या कुलसचिवांनी त्यांच्या विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सदर उपक्रमाबाबत सूचना द्याव्यात. सदर उपक्रमासाठी विभागांतर्गत सर्व संचालक, विभागीय सह संचालक, उपसंचालक/सहायक संचालक, जिल्हा स्तरावरील अधिकारी व कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, कार्यक्रम समन्वयक या शिवाय विद्यापीठ स्तरावरील कुलसचिव, उप कुलसचिव, सहायक कुलसचिव, महाविद्यालय स्तरावरील प्राचार्य, उप प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, इ. सर्व घटकांचे सहकार्य अपेक्षित असून सदर उपक्रम यशस्वी होण्याकरिता सर्वांनी योग्य ती कार्यवाही करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १६ ऑगस्ट, २०२२ नंतर तातडीने सर्व संचालकांमार्फत शासनास सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.go.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२२०७२२११३६२२८२०८ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2022.07.22 11:40:20 +05'30'

**( प्रताप लुबाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (उ.व तं.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (उ.व तं.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव (ग्रामविकास व पंचायत राज विभाग), मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई.

९. प्रधान सचिव (पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग), मंत्रालय, मुंबई.
१०. प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई
११. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.
१२. सचिव, सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
१३. सचिव, शिक्षण शुल्क व प्रवेश नियंत्रक समिती, मुंबई.
१४. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे.
१५. संचालक (उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण/कला/ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य, पुणे/मुंबई.
१६. कुलसचिव (सर्व अकृषी विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे)
१७. सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण), उपसंचालक (कला), सहाय्यक ग्रंथालय संचालक, (संबंधित संचालकांमार्फत).
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई त्यांना विनंती आहे की, प्रस्तुत शासन निर्णयाला व्यापक प्रसिद्धी तात्काळ द्यावी.
१९. सर्व सह सचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. राज्य संपर्क अधिकारी (रा.से.यो.), उच्च व तंत्रशिक्षण विभाग.
२१. अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व कार्यासने) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय.
२२. निवडनस्ती (आस्था-२)